## महाराष्ट्र शासन

**क्र.निभासं २०१६/अनौ.२७(११६)/का.१७**

विधि व न्याय विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

**दिनांक :-२३ ऑगस्ट २०१६.**

**विषय :-** निबंधक भागीदारी संस्था, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयातील नवीन भागीदारी संस्थांची नोंदणी व ऑनलाइन पध्दतीने नोंदणीकृत झालेल्या भागीदारी संस्थेच्या घटनेतील बदलांची नोंदणी ऑनलाइन पध्दतीने करण्याबाबत.....

**संदर्भ :-** निबंधक,भागीदारी संस्था यांचे आदेश क्र.आस्था-३८११/संगणकीकरण (१४८/११)/का.२/८५५ दि.१६.०२.२०१३

**प्रस्तावना:-**

निबंधक भागीदारी संस्था,महाराष्ट्र राज्य,मुंबई या कार्यालयाचे भारतीय भागीदारी कायदा, १९३२ अन्वये होणारे कामकाज ऑनलाईन पध्दतीने करण्याकरीता जून २०१२ पासून संकेतस्थळ कार्यान्वित करण्यात आले आहे. परिणामी नवीन भागीदारी संस्थांच्या नोंदणीचे आणि नोंदणी झालेल्या भागीदारी संस्थांच्या घटनेतील बदलांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्वीकारणे व त्याची नोंदणी ऑनलाईन पध्दतीने करणे, संदर्भाधीन आदेशान्वये अनिवार्य करण्यात आले आहे. दि.०१.०७.२०१५ पासून नवीन भागीदारी संस्थांची नोंदणी व ऑनलाईन पध्दतीने नोंदणीकृत झालेल्या भागीदारी संस्थेच्या घटनेतील बदलांची नोंदणी देखील ऑनलाईन पध्दतीनेच करण्यात येत असून याबाबतची आक्षेपपत्रे संबंधितांना ऑनलाईन पध्दतीनेच उपलब्ध करुन देण्यात येतात. तसेच जुन्या पध्दतीने सादर करण्यात आलेल्या अर्जावर आक्षेपपत्र पाठविले असल्यास असे अर्ज देखील ऑनलाईन पध्दतीनेच नवीन फी व दंडासहीत स्वीकारण्यात येतात. सदर वस्तुस्थिती विचारात घेता निबंधक भागीदारी संस्था, महाराष्ट्र राज्य, मुंबई येथील यासंदर्भातील कामकाज केवळ ऑनलाईन पध्दतीनेच करण्याबाबतचा निर्णय घेण्याची बाब विचाराधीन होती.

निबंधक, भागी
महाराष्ट्र रा
आवक क्र. ...
दिनांक : ३१

**शासन निर्णय:-**

का-2
785
9/9/16

जुन्या नोंदणी पध्दतीच्या कार्यप्रणालीमुळे होणारा अतिरिक्त खर्च व वेळाचा अपव्यय टाळण्याकरीता तसेच भागीदारी संस्थांचे कामकाज अधिक पारदर्शक व गतीमान करण्यासाठी भागीदारी संस्थांची नोंदणी करण्याची जुनी कार्यपध्दती याद्वारे रद्द करण्यात येत आहे.ज्या भागीदारी संस्थांची नोंदणी यापूर्वी ऑनलाईन पध्दतीने करण्यात आली आहे, अशा भागीदारी संस्थांच्या घटनेतील बदलांचे कामदेखील ऑनलाईन पध्दतीने करण्यात येईल.ज्या भागीदारी संस्थांची नोंदणी ऑनलाईन पध्दतीने झालेली नाही, अशा सर्व भागीदारी संस्थांच्या घटनेतील बदलांची नोंदणी संपूर्ण डिजिटायझेशन होईपर्यंत ऑनलाईन पध्दतीने करण्यात येणार नाही.

२. निबंधक भागीदारी संस्था, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयातील सर्व अधिकाऱ्यांनी यापुढे भागीदारी संस्था नोंदणीच्या प्रमाणपत्रावर डिजिटल स्वाक्षरी करणे बंधनकारक राहील.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

23.08.16

**( राजेंद्र द. सावंत)**
**विधि सल्लागार नि सह सचिव**

**प्रत:-**

१. प्रधान सचिव व विधि परामर्शी, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई

२. निबंधक , भागीदारी संस्था, महाराष्ट्र राज्य,मुंबई
३. सहाय्यक निबंधक भागीदारी संस्था, पुणे/नागपूर/औरंगाबाद.
४. निवड नस्ती/का.१७